NEWS!

खेलो इंडियातील विद्यार्थ्यांना सन्मान



# खेळामध्ये करिअरच्या उत्तम संधी : कसगावडे

■ राष्ट्रसंचार न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : विविध खेळांमध्ये करिअरच्या उत्तम संधी असून खेळाडूंना शासकीय नोकरीत आरक्षणाची सुविधा आहे. खेळाडूंनी कठोर मेहनत, जिद्द, परिश्रमाच्या बळावर स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन पुणे जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले. ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ च्या वार्षिक पारितोषिक वितरण व गुणगौरव समारंभाप्रसंगी बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील होते. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, सतीश नाईकरे, प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे शारीरिक शिक्षण संचालक प्रतिमा लोणारी व विद्यार्थी उपस्थित होते. महादेव कसगावडे पुढे म्हणाले, की खेळामुळे शारीरिक व मानसिक क्षमता वाढते. तसेच त्यांच्यात आत्मविश्वास, निर्णयक्षमता वाढते. उद्याच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी खेळाडू सक्षमपणे तयार होतो. यासाठी पालकांनी आपल्या पाल्यांना खेळू द्यायला हवे, असे आवाहन त्यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना त्यांनी सर्वच विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. संस्थाध्यक्ष अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्राच्या पर्यायाचा करियर म्हणून विचार करण्याचे आवाहन केले. खेलो इंडिया स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त वैष्णव ठाकूर (वेटलिफ्टिंग), आंतरविद्यापीठ स्पर्धेत रौप्यपदक विजेती सारिका शिनगारे (वेटलिफ्टिंग) यांसह अक्षदा वाघ (सायकलिंग) ऐश्वर्या खळदकर (क्रॉसकंट्री), एकता वाळुंज (वेटलिफ्टिंग) या राष्ट्रीय स्तरावर सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.